**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर शहरात मा.आयुक्तांचा पाहणी दौरा**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी दि. 28 जुलै 2025 रोजी शहराचा पाहणी करून नागरी सेवा सुविधा, स्वच्छता उपक्रम व पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. या पाहणी दौ-या दरम्यान आयुक्तांसह अतिरिक आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे,अतिरिक्त आयुक्त श्रीम.प्रियांका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मु.) श्रीम.कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबीत तसेच इतर मनपा अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील विकासकामे अधिक गतीमान व नागरी सेवांमध्ये नवीन सुधारणा घडून याव्यात आणि स्वच्छतेला चालना मिळावी या उद्देशाने स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, स्व. प्रमोद महाजन सभागृह, स्वदेशी सौरऊर्जेवर आधारित विंड्रो सेंद्रिय खत प्रकल्प, मलनि:सारण केंद्र क्रमांक 8, परिवहन बस डेपो व जरीमरी तलाव या महत्वाच्या ठिकाणांची त्यांनी पाहणी केली. तसेच रस्त्यांची सद्यस्थिती, नाले साफ सफाई, अतिक्रमण, गार्डन पाहणी, दुभाजक पाहणी, झाडांची छाटणी करून झाडांची देखभालदुरूस्ती (Maintain) करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिले.

या दौऱ्यात संबंधित विभाग प्रमुख व अधिकारी यांच्याकडून विकास कामांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या. स्वच्छ शहर ही आपली ओळख टिकवण्यासाठी स्वच्छता उपक्रम अधिक प्रभावी राबविण्यावर भर देण्याचे तसेच नागरिकांना अधिक सक्षम नागरी सुविधा देण्यासाठी नव्या योजना आखण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी यावेळी दिले. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेची विशेष काळजी, वाहतूक व्यवस्थापनाचे अधिक चोख नियोजन, पाणीपुरवठा व मलनि:सारण व्यवस्थेची सुधारणा आणि हरित क्षेत्रांचे जतन — या सर्व घटकांवर विशेष भर देण्याचे आदेशही त्यांनी संबंधित विभागांना दिले.

शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महापालिका कटिबद्ध असून प्रशासन व नागरिकांच्या एकत्रित सहभागातूनच स्वच्छ, सुंदर व मिरा भाईंदर शहराचा शाश्वत विकास साकारता येईल, असा विश्वास मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी व्यक्त केला.